# अमृतमहोत्सव वर्षातील भारतीय लोकशाही

**प्रा.बोगुलवार अशोक एच.,** सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, राजे रामराव महाविद्यालय, जत जि.सांगली-४१६४०४

---

आज भारतीय लोकशाही एका स्थित्यंतरातून मार्गक्रमण करताना तिच्या यशोगाथ्याचे अभ्यास करणे महत्वाचे आहे. भारताने लोकशाही व्यवस्थेचे स्वीकार करून भारताला सुजलाम सुफलाम बनवण्याच्या दृष्टीने वाटचाल करताना स्वातंत्र्यप्राप्ती नंतर भारतासमोर असलेल्या अनेक समस्याचे निराकरण करण्यासाठी सतत वेगवेगळया योजनांच्या माध्यमातून प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते. लोकशाहीच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकाला स्वातंत्र्य उपलब्ध करून देऊन प्रत्येकाचा विकास करण्याचे स्वप्न पाहताना त्यामध्ये आजच्या युवकाची अवस्था पहिले तर त्यांच्या समोरील लोकशाहीचे चित्रण समजण्यास मदत होईल. 26 जानेवारी 1950 रोजी, भारत महान बनवायचा हे ध्येय घेऊन आपल्या देशाने वाटचाल सुरू केली. त्यासाठी कोणता मार्ग स्वीकारला? लोकशाही!समावेशक लोकशाही दृष्टिकोनानुसार आर्थिक सत्तेच्या वाटपात समता आणून आर्थिक समानता निर्माण करणे म्हणजे आर्थिक लोकशाही.आर्थिक लोकशाही साध्य करण्यासाठी राजकारण विरहीत आर्थिक प्रक्रिया, विषम आर्थिक सत्तेचा अभाव, आर्थिक निर्णय प्रक्रियेत लोकांचा सहभाग, बाजार नियंत्रणासाठी सामाजिक नियंत्रण, सार्वजनिक खर्च, समाजवादी आणि मिश्र अर्थव्यवस्था अनुकूल आर्थिक संस्था, कमीत कमी आर्थिक विषमता या अटींची पूर्तता आवश्यक असते. आर्थिक लोकशाही निर्देशांक आणि गरिबी, विषमता उपाय यांच्यात प्रबळ, उणे आणि महत्त्वपूर्ण सहसंबंध दिसून आला.समाजात जीवनपद्धती म्हणून लोकशाही रूजत नाही, तोपर्यंत ती राज्यपद्धती' म्हणून यशस्वी होणार नाही, हे उघड आहे. लोकशाही' हा काही आदर्श मार्ग नाही. कमीत-कमी दोष असणारा, कमीत-कमी त्रास देणारा आणि जास्तीत-जास्त लोकांचे हित साधणारा हा 'लांबचा' मार्ग आहे.लोकशाहीत जनता ही सर्वोच्च असते. जनता आपल्या मताधिकाराद्वारे आपले प्रतिनिधी निवडून त्यांना लोककल्याणासाठी शासन चालविण्याचा अधिकार देते.

देशाच्या आर्थिक, औद्योगिक, शैक्षणिक व सामाजिक विकासाशी संबंधित जास्तीत जास्त विषयांमध्ये जास्तीत जास्त नागरिकांचा अधिकाधिक अर्थपूर्ण व कृतिशील सहभाग असणे आणि त्यामुळे देशातील विविध समाजघटकांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होणे म्हणजे अधिक सकस लोकशाहीकडे वाटचाल करणे होय.आपले राष्ट्रपती डॉ. कलाम म्हणतात, 'दोन हजार वीस साली भारत हे राष्ट्र महासत्ता बनणार', 'महासत्ता' झाल्यावर भारत महान झाला' असं म्हणता येईल का? याचं उत्तर अनेक तरुणांप्रमाणेच मलाही मिळालेलं नाही. विकास धोरण निश्चित करताना ते घटनेच्या चौकटीतच तयार करून त्याची अंमलबजावणी व्हावी. समता, सामाजिक न्याय, सामाजिक कल्याण, समाजवादी समाजरचना या घटनेच्या मूळ गाभ्यावर आर्थिक धोरणाचा प्रतिकूल परिणाम होता कामा नये.लोकशाही म्हणजे प्रौढ मतदानाने निवडून आलेल्या प्रतिनिधींनी चालवलेले राज्यशासन.स्वांतत्र्यापासून लोकशाही रुजलेल्या भारतात नागरिकांना मिळालेल्या गुप्त मतदानाच्या अधिकाराचा उपयोग करून भारतीय नागरिकांनी अनेक सरकारे बदलली आहेत. या एकाच अधिकाराचा उपयोग निवडणुकांच्या वेळी करून लोकशाहीच्या आज असलेल्या पातळीवर नागरिकांनी समाधानी राहायचे, की अधिक सकस लोकशाहीकडे वाटचाल करण्याच्या दिशेने प्रयत्न करायचे हा मुद्दा लोकशाहीच्या दृष्टीने महत्वाचा ठरतो.राष्ट्रीय स्तरावर एक मोठा प्रश्न गंभीर स्वरूप धारण करीत आहे, तो म्हणजे आधुनिक सुशिक्षितेतून अंधश्रद्धेकडे वाटचाल.आर्थिक संपन्नता असलेला सुशिक्षित मध्यम वर्ग त्यांच्या जाळयात अडकत आहे.

देशातील आर्थिक लोकशाहीचे स्वरूप व व्याप्ती तसेच समस्या व आव्हाने विचारात घेणे गरजेचे आहे. भारत सरकारच्या मते, आर्थिक वर्ष २०२०-२१ च्या पहिल्या तिमाहीत स्थिर किमतीनुसार (२०११-१२), देशाचे स्थूल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) २३.९ टक्के एवढ्या वेगाने घटले व शेती, वने आणि मस्त्य वगळता (३.४ टक्के), इतर सर्व उत्पादक क्षेत्रे आणि उपक्षेत्रांनी घट

दर्शवली आहे. त्यामुळे मुळातच एक टक्क्यापर्यंत रोजगार निर्मिती दर असलेल्या देशात बेकारी व गरिबी वाढत आहे. संघटित क्षेत्रात दहा टक्क्यांपेक्षाही कमी लोक काम करतात. त्यामुळे९० टक्क्यांपेक्षा अधिक कामगार औपचरिक क्षेत्रात काम करत असून त्यांना काम, वेतन, सामाजिक सुरक्षितता यांची कोणतीही शाश्वती नाही. म्हणजेच स्वातंत्र्या ७५ व्या वर्षात हि अनेक सुविधा प्राप्तकरून देण्यात भारताला अजूनही यश मिळाले नाही.

सरकारने घोषणा केली १४ वर्षांपर्यंतच्या सर्व मुलामुलींना मोफत शिक्षण दिले जाईल. परंतु ही घोषणा पूर्ण झालीच नाही. गरिबी ही आपल्या लोकशाहीची सर्वात जुनी व गुंतागुंतीची समस्या आहे. स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारत याच्याशी झुंजत आहे.लोकप्रियतेचा एक प्रकारे लिलावच होतो. म्हणून लोकशाही म्हणजे झुंडशाही असे म्हणतात. लोकशाहीचे जे रूप आज आपणास पाहावयास मिळते ते अत्यंत निराशाजनक आहे. आज नेते स्वत:च लोकशाहीला वाचविण्यासाठी मोठमोठ्या गोष्टी करतात. पण काम मात्र राजेशाहीप्रमाणे करतात.आपल्या लोकशाहीची सर्वात मोठी समस्या ही आहे की लोकशाहीत राजकारणाला व्यावसायिक रूप दिले जाते.लोकशाहीत लोकांचा पक्ष पंगू झाला असून तो संख्या व स्वार्थाच्या कुबड्यांवर चालत आहे. यात लोकप्रतिनिधी योग्यतेच्या आधारावर निवडून येत नसून मतांवर निवडून येतात.अल्पमतात असलेले सरकार फक्त विरोधच करीत बसते. ही केवळ समस्या नसून लोकशाहीला मिळालेला शाप आहे.सुरक्षा व्यवस्था असूनही एखाद्या विशिष्ट व्यक्तीची गोळी मारून हत्या करतात. ही गोष्ट आपल्या सुरक्षा व्यवस्थेतील उणीवांकडे बोट दाखविते. अशा परिस्थितीत कुणीही स्वतःला सुरक्षित समजू शकत नाही. आज देश ऐक्य व अखंडतेचा समस्येशी झगडत आहे. देशात अनेक धार्मिक शक्ती डोके वर काढत आहेत.नेते निवडणुकीच्या वेळी जनतेच्या भावना उत्तेजित करतात. जनतेला अनेक वचने देतात पण ती पुरी करीत नाहीत. त्यामुळे लोकशाहीचे भविष्य अंध:कारमय होते.

प्रादेशिक राजकारणामुळे देशाच्या अखंडतेचे नुकसान होते. असे लोक वेगळया वेगळया राज्यांची मागणी करतात. त्यासाठी कायदेशीर-बेकायदेशीर सगळे मार्ग अवलंबितात परंतु आपण हे नेहमी लक्षात ठेवले पाहिजे की देशाचे ऐक्य आणि अखंडता यावर लोकशाहीचे यश अवलंबून असते.लोकशाही यशस्वी होण्यात बेकारीची समस्या अडथळा ठरते, ही समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. शिकलेले बेकार आपला आत्मविश्वास गमावतात. हीच बेकारी समाजात अराजकतेला जन्म देते. म्हणून ही समस्या लवकरात लवकर सुटली पाहिजे.सरकारने यासाठी अनेक कार्यक्रम राबविले पण उपयोग झाला नाही. जोपर्यंत गरिबी हटणार नाही तोपर्यंत लोकशाही यशस्वी होणार नाही. लोकसंख्येत होणारी भरमसाट वाढ ही लोकशाहीची आणखी एक गंभीर समस्या आहे.जेव्हा आपण आपल्या देशातील लोकशाहीकडे पाहतो तेव्हा समस्याच समस्या दिसतात. त्याच्यासमोर लोकशाही किती दिवस टिकेल, सरकार चालविणाऱ्या नेत्यांनी यावर गंभीरपणे विचार करावा आणि काही तरी कायमचा उपाय करावा म्हणजे देश एकतेच्या सूत्रात बांधलेला राहील. देशाचे अमृतमहोत्सव राबवताना ज्या मध्ये अजूनही यश मिळालेले नाही त्याकडे कटाक्षाने पाहणे अधिक गरजेचे आहे फक्त कागदाचा विकास झाला म्हणजे विकास होत नाही तर त्यांमध्ये आत्मीयता अधीक दृढशील बनवण्याची गजर आज निर्माण झाले आहे.

**संदर्भ सूची**

१) अर्थ-व्यवस्था व राज्य-व्यवस्था- डॉ. सुभाष आठले, मे.१९९९

२) भारतीय लोकशाहीची प्रक्रिया – डॉ.अलका देशमुख, २०१४

३) भारतीय लोकशाही समोरील आव्हाने – डॉ बाळ कांबळे, डायमंड पब्लिकेशन, २०१०

४) भारतीय शासन व राजकारण – डॉ.नितीन बीरमल व डॉ.वैशाली पवार, डायमंड पब्लिकेशन, २०१३

५) लोकशाही निवडणूक प्रक्रिया आणि सुशासन –डॉ.प्रशांत विघे व डॉ.धर्मेंद्र तेलगोटे, श्री साई प्रकाशन, नागपूर. २०१९